www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Series ONS

SET-4

कोड नं.
Code No. **9**

रोल नं.
Roll No. | | | | | | | |

परीक्षार्थी कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें।
Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में मुद्रित पृष्ठ **5** हैं।
- प्रश्न-पत्र में दाहिने हाथ की ओर दिए गए कोड नम्बर को छात्र उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर लिखें।
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में 8 प्रश्न हैं।
- **कृपया प्रश्न का उत्तर लिखना शुरू करने से पहले, प्रश्न का क्रमांक अवश्य लिखें।**
- इस प्रश्न-पत्र को पढ़ने के लिए 15 मिनट का समय दिया गया है। प्रश्न-पत्र का वितरण पूर्वाह्न में 10.15 बजे किया जाएगा। 10.15 बजे से 10.30 बजे तक छात्र केवल प्रश्न-पत्र को पढ़ेंगे और इस अवधि के दौरान वे उत्तर-पुस्तिका पर कोई उत्तर नहीं लिखेंगे।
- Please check that this question paper contains **5** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains 8 questions.
- **Please write down the Serial Number of the question before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास*
*निर्धारित समय : 3 घण्टे*
*Time allowed : 3 hours*

*गुण : 100*
*अधिकतम अंक : 100*
*Maximum Marks : 100*

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

## SECTION - A

**1.** खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा :

परीक्षा ही जशी ज्ञानाची चाचणी असते, तशीच व्यक्तिमत्त्वाची छाननी पण असते. परीक्षेच्या कसोटीवर व्यक्तिमत्त्व घासले जाते आणि त्यातला दुबळेपणा उघडकीला येतो. यश आणि अपयश सापेक्ष असतात. त्यामुळे कोणत्याही परीक्षेला बसण्यापूर्वी आपली यशाची व्याख्या काय, याचा आढावा पालक आणि पाल्य यांनी एकत्र बसून घेतला पाहिजे. पाल्याची आवड व कुवत पाहून हा निर्णय अवलंबून ठेवला पाहिजे. नुसतं मेडिकलला प्रवेश मिळवणे, असं एकच एक ध्येय ठेवणे धोकादायक असू शकते. समजा एखाद्या विद्यार्थ्याने जिवावर उदार होऊन असा कुवतीबाहेरचा ताण घेऊन प्रवेश मिळवलाच तरी पुढे सतत कुवतीपेक्षा जास्त ताणाचे ओझे किंवा आवड नसलेल्या करिअरचे जोखड जन्मभर वागवावे लागेल. मग व्यक्तिमत्त्वावर सतत ताण देऊन, गटांगळ्या खात खोल, अति कष्टाने जीवन जगण्यात कसला आला आहे आनंद ?

रोजचे जीवन हे 'बिकट वाट वहिवाट' म्हणून स्वीकारले तर कुठले आले आहे सुख ? असले शिवधनुष्य उचलून छाताडावर पाडून घेण्यापेक्षा सहजसाध्य, रुचिसाध्य क्षेत्र निवडावे त्यातच निरामय, आरामदायी, सुखी जीवन असू शकेल. ज्याची बारा फूट लांब उडी मारण्याची क्षमता आहे, त्याला सोळा फुटांच्या मागे लावून देऊन त्याच्या जीवनाची होरपळ होण्याचा संभव जास्त आणि सोळा फूट उडी मारता न आल्यास 'अपयश' मानणे ही आत्मवंचना होय !

थोडक्यात, सुखाची व्याख्या ज्याची त्याने ठरवावी आणि तसे मार्गक्रमण करावे. बुद्धिमत्ता ही आकाशस्थ देणगी असते. पण हिरा जसा कोंदणातच खुलून दिसतो त्याप्रमाणे बुद्धिच्या तेजाला व्यक्तिमत्त्वाच्या जोड गुणांचे कोंदण लागते. आपण त्याचे मानसिक जोडगुण मात्र प्रयत्नांनी वाढवू शकतो. बुद्धी वाढवता आली नाही, तरी तिचा वापर आपण वाढवू शकतो.

**प्रश्न –**

(i) परीक्षेचे महत्त्व काय आहे ? **2**

(ii) कुवतीबाहेरचे निर्णय धोकादायक कसे ठरतात ? **2**

(iii) माणसाची आत्मवंचना केव्हा होते ? **2**

(iv) आपण बुद्धिचा वापर कसा वाढवू शकतो ? **2**

(v) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या व त्याची संपर्कता स्पष्ट करा. **2**

## SECTION - B

**2.** खालीलपैकी **एका** विषयावर 25 ते 30 ओळींत निबंध लिहा : **15**

(i) राजकारण आणि आजचे युवक

(ii) वृद्धाश्रमांची गरज आहे का?

(iii) वाचाल, तर वाचाल!

## SECTION - C

**3.** खालीलपैकी कोणत्याही **पाच** विधानांमध्ये कंसांतील सूचनेप्रमाणे बदल करा : **15**

(i) माधवची मी काळजी घेईन. (विध्यर्थी करा)

(ii) हा घाट सोपा नाही. (होकारार्थी करा)

(iii) विद्यार्थ्यांनी वर्गात शांत बसावे. (कर्तरी करा)

(iv) मला तुझ्याबरोबर गावी नेशील का? (आज्ञार्थी करा)

(v) बचतीच्या सवयीमुळे आपले धन वाढत जाते. ('वृद्धी होणे' हे क्रियापद वापरा)

(vi) चारीत्र्यवान तरुण ही देशाचि संपती आहे. (दुरुस्त करा)

(vii) विद्येमुळे माणूस सुसंस्कृत होतो. (विध्यर्थी करा)

**4.** (अ) वचन बदला : **2**

(i) नदी (ii) डोंगर

(ब) क्रियाविशेषण बनवा : **3**

(i) ताठ (ii) राग (iii) आश्चर्य

**5.** कंसांतील शब्दांची योग्य रूपे वापरून वाक्य पूर्ण करा. (कोणतेही **पाच**) **5**

(i) मुलांनी (देव) प्रार्थना केली.

(ii) पावसामुळे सर्व (गाडी) उशीरा आल्या.

(iii) गाणे (गाणे) कार्यक्रमाचा शेवट केला.

Prepp
Your Personal Exams Guide

(iv) काल तू (मी) मदत केली होतीस.

(v) मी काल रात्री दूध (पिणे).

(vi) त्याने (शेजारी) पैसे घेतले.

(vii) सूर्यास्ताचे (सुंदर) अवर्णनीय होते.

## SECTION - D

**6.** (अ) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : **10**

(i) ''मला वाटलं या पिठात विष असेल तर आपण ते खाऊन मरूया.''

(ii) ''अंगावर चांदणं बरसलं तर कसं वाटेल तसंच काहीतरी तिला पाहिल्यावर मला होऊन गेलं.''

(iii) ''ते दु:खाश्रू होते की आनंदाश्रू? निश्चितच आनंदाश्रू!''

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा : **10**

(i) भुते कोठे असतात याबाबत तुकारामाने पाहुण्याला कोणती माहिती सांगितली?

(ii) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी आदर्श त्रिकोण कोणास व का म्हटले आहे?

(iii) बाबूरावांकडे सूनबाईंनी यंत्र मानवाबद्दल कोणकोणत्या तक्रारी केल्या?

**7.** (अ) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : **10**

(i) ''टाया वाजविती पानं
दंग देवाच्या भजनी''

(ii) ''कोटि कोटि असतील शरीरे मनगट अमुचे एक असे''

(iii) ''अशा वर्तनाने सर्वां सुख द्याल।।
स्वत: सुखी व्हाल।। जोती म्हणे।।''

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** पद्यांशातील अलंकार ओळखा : 5

(i) ''वनाहुनीही उजाड झाले रामाविण ते धाम''

(ii) ''निर्मक चित्ते झाली नवनीते
पाषाणा पाझर फुटती रे''

(iii) ''या दानासी या दानाहुन अन्य नसे उपमान''

8. (अ) एच टी एम एल चे महत्त्व सांगा. 10

**किंवा**

मुलाखतीचे हेतू कोणकोणते आहेत ?

(ब) सूत्रसंचालकाच्या अंगी कोणकोणते गुण असावेत ? 5